
साहित्य संस्कृती प्रकाशन
'संस्कृती, कला, जाणिवा जोडणारा सेतू'
सप्टेंबर · २०१४
अनाहत

# अनुक्रमणिका


कविते गं........................................................................४

रसिया..........................................................................५

तुझे अस्तित्व ...............................................................१०

रात्र ..............................................................................११

होरपळ .........................................................................१२

शोध.............................................................................१४

बहिष्कार........................................................................१६



साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

# अनाहत सप्टेंबर २०१४

कविता का करायची पासून कविता केली नाही तर काय होईल अशा  विचारचक्राला  लिहिणारा आणि वाचणारा असे दोघेही सामोर जात असतात. आपल्या अभिव्यक्तीशी प्रत्येकजण किती प्रामाणिक आहे हा प्रश्न व्यक्तीसापेक्ष आहे. तरीसुद्धा स्वतःचे जीवन आणि कविता अनेकदा वेगळी नसते. किंबहुना जगण्यातले बारकावे, कंगोरे सगळे काही कवितारूपाने आपण तपासत असतो. हा एक प्रकारचा आत्मशोध आहे.

हा आत्मशोध ही सतत सुरू असणारी क्रिया आहे. ती क्रिया अनेकदा आनंददायी असते, कधी क्लेशदायी तर कधी अतिशय कठोर भूमिका घेणारी. या आत्मशोधाकरता कधी मुखवटा घ्यावा लागतो, कधी तो नाकारावा लागतो. असे प्रयत्न नकळतही सुरु असतात. प्रत्येक कवितेची एक गोष्ट असते!

अनाहतला मिळणारा प्रतिसाद वाढतो आहे,. नव्या कविताच्या रूपाने नवे कवी आपल्यासमोर येतील.

नव्या कवितासंग्रहाचा परिचय अनेकांना विशेष आवडला असे आम्हाला ज्यांनी कळवले त्यांचे आभारी आहोत.

रसिकांना सप्टेंबरचा अंकही आवडेल अशी खात्री आहे.

सोनाली

## कविते गं...

आपण आपल्या भेटण्याच्या
गोष्टी करत राहूच तश्या
आरास मांडत राहू
लख्ख अवघ्या शब्दांच्या

अपलक भिंतीकडे बघण्याचा
आंधळेपणा करत राहुच तश्या
आरसा लावत राहू
मख्ख कोडग्या चेहऱ्यांचा

एकमेकींना बघून जोखण्याचा
वेडेपणा करत राहूच तश्या
वारसा जपत राहू
रख्ख अस्थानी हास्याच्या

आतले अंगार निरखण्याचा
अनघडपणा मिरवत राहूच तश्या
कोळश्याने लिहून काढू
हक्क तुझ्या माझ्या निखाऱ्यांचा

**--चैताली.**

## रसिया

त्याला पाऊस व्हायची फार घाई.
एकतर तू तरी पाऊस हो किंवा मी तरी...

एकतर तू तरी बरस किंवा मला तरी बरसू दे...
मनसोक्त तुला हवा तसा; हवा तितका... किंवा तू बरस...
नाही तर असं करु दोघेही बरसू, सर-सर होऊन जाऊ...
किती ते आर्जवी निमंत्रणे तुझी...

मी जाणून माझे दोन्ही हात मागे बांधून ठेवलेत.
न जाणो तुझ्या हातात भिनून कधी...?
खूप-खूप गोंधळ असतो बघ विचारांचा, मनांचा...
म्हणून फार-फार राखून ठेवते मी स्वत:ला स्वत:पासून.
तुलाही सांगतेच की रे,
तुला मी माझ्यापासून वाचवण्याचा प्रयत्न करतेय म्हणून...!

पण अनेक वार सोसून, झेलून, रेलून तू
माझ्यासमोर उभा माझ्या समीप...
माझ्या ओठांसमोर हसत अगदी मधाळपणे.

मी कितीदा खाली पाहू, कितीदा नजरेस चोरू,

तुला दिसू नये, कळू नये म्हणून...

कितीदा किती विषय तयार करु आणि त्या विषयांत?

तुला गुंतलेला पाहून मनाच्या टीपकागदावर तुला टिपून घेऊ?

पण एकदाही तू पूर्ण उमटत नाही नि काहीतरी राहूनच जातं

निसटूनच जातं.

एकवेळ तुला म्हटलं,

'मी खूप छान रेखाचित्र काढते.

तर गुलछबू तू काय म्हणालास,

मी बसतो ना तुझ्यासमोर! काढ तू...'

अरे येडू, कसं शक्य ते?

मी तर पहातच राहीन ना रे, तुझ्याकडे- अनिमिष नेत्रांनी.

मला न -माझी ही तहानच कळत नाही.

मला माझ मनच कळत नाही.

मला हे काय होतंय. याला काय नाव द्यावं?

याची काय ओळख असावी? याची कशी सुरुवात व्हावी?

याचा शेवट...?

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

शहारत बघ, हा सारा विचार आल की अंग शहारतं.

प्रेम सहयोगातून तयार होतं,

स्पर्श म्हणजे प्रेम नव्हे.
सोबतीनं प्रेम निर्माण होतं.
विचार जुळल्यानी ते टिकतं.
एकमेकांसाठीच्या बलिदानाने अजरामर होतं.
एकनिष्ठ राहिल्याने स्वर्गलोकास प्राप्त होतं.

संस्कृती, संस्काराच्या, सुविचारांच्या पाट्यांचा

ढीगच्या ढीग  पडलाय डोक्यात...

पण त्यात एकही पाटी अशी नाही की,

कुणी आवडलच पहिल्या नजरेत,

पहिल्या भेटीत,

पहिल्या नजरेच्या टप्प्यात या विश्वासाने की,

हो, आपला सोबती हा असाच असायला हवा...

हा ,असाच असायला हवा होता...त्याचं काय?

त्याच्यासाठी न्याय काय?
मनासारखं वागण्याच्या
असामाजिक समजल्या जाण्याच्या तत्त्वावर ही बंधने फळू-फुलू

द्यायची ती कशी?

हा सारा शासनमान्य शासनाचा भाग.
शिक्षा फक्त मला नि माझ्या सबंधांना,
आजन्म कोरडं ठणठणीत राहण्याचा कारावास.

हो हे सारं असंच... रितीभातीप्रमाणे चिकटलेले,
म्हणून मग मनास अधिकाधिक कठोर
अधिकाधिक पाषाण होण्यास कारणीभूत ठरलेलं,
सहज म्हणून वितळायचे नाही, मऊ व्हायचे नाही.
पण मग कोणी धडक दिलीच तर...?

धडधडत्या हृदयाने आपणच आपल्या मनावर काबू ठेवत...
प्रेमाच्या व्याख्येला आपल्या मनाप्रमाणे अर्थ देत
निर्दोष सुटकेचा प्रयत्न.
अधिकाधिक स्वत:त गुंतून स्वत:ला न्याय...

ऑल इज वेल,
सगळे आपाल्या हातचे खेळ.
या हातावरुन त्या हातावर,
या बोटावरुन त्या बोटावर स्वत:च स्वत:ला खेळवत.
मध्ये पडलो की बाद... जसे आता झाले.
माझे मन माझ्याच हातून निसटून बाद झाले...

मला माहीत आहे तुला असा शब्दांचा किस,
विचारांचा भुगा नाही आवडत.

तू कसा बेफिकीर, बिनधास्त, बेडर
माझ्या कुशीत मात्र भीतीचं बी पेरलेलं,
किती फरक आहे, सरिता आणि सागरात!
तरी सरितेला उधाणलेल्या सागराची ओढ
जशी मला तुझी. खरं तर खूप थकले रे मी
स्वत: स्वत:शी लढून...

असं वाटतं येत्या पावसात स्वत:ला आतून-बाहेरून धुऊन
काढावं...
पण मग दिवसाच्या कुठल्याही प्रहरी तू मला लपेटलेला दिसतो
त्याचं काय?
अंतर्मनातून तूच बोलतोस...
कधी-कधी तर मनातच मावेनासा होतो.
मग मी धावून आलेल्या सरीखाली चिंब भिजत
स्वत:ला पावसाच्या चांदण्यांनी टिपूर करुन घेत...
एका पारदर्शी थेबांत तू दिसतोही गालात हसून उमटलेला...
ओठांवरील अमृताचे थेंब हलकेच टीपत... रसिया

**-सुनिता झाडे**

(आगामी 'रसिया' या काव्यात्मक ललितबंधातून)

## तुझे अस्तित्व

रणरणत्या उन्हाच दिवस जसा...
तसा तुझा तो श्वास.
मला होता ...पूर्वीचाच ठाऊक.

मझ्या हस्तरेषामध्ये तुझी रेषाच नाही.
तुझ्या पर्यंत नेणारे भाग्य नाही.
माझी नसलेली तुझी नजर,
स्पर्शून जाते माझे शरीर माझा आत्मा.
तू नसलेले तुझे अस्तित्व,
सोबत करते दिवस भराची.
थोडी कुठे रात्री ..गाद्यांवर सुखावते..,
मुलांवर, पतीवर माझी स्नेहनजर फिरविते..
तेव्हां देखील ,माझ्याजवळ तू असतोस.
आपल्या सावळया बोटांच्या नखाने
शरीरभर असंख्य नावे कोरून जातो.
तुला कल्पना आहे--?भल्या पहाटे झोप उघडण्यापूर्वी ...
ती सारी मला बुजवावी लागतात.
कारण...?
अपूर्ण गर्भाप्रमाणे
त्यांचे नसणेच महत्वाचे आणि सलणारे असते.

**-नीशी (नीलिमा शिकारखाने)**

## रात्र

रात्र निर्भर मोकळी,
जवळ केवळ सावली
सावलीला गंध नाही, रात्र निर्मम चालली

रात्र पुढती चालली,
अंधार मागून धावतो
या अशा खेळात आता जीव भलता कोंडतो

एक दिसते फुल येथून
रंग फेकीत हासले
जवळ जावे, वाट सरते, नेत्र उरती झाकले

फुल कुठले...रंग कुठले...
.वाट कुठली सांडली....
भ्रमात जाती नेत्र वेडे, नजर कोठे थांबली

थांबणे आहे इथे या,
रात्र संपत चालली
सावलीला स्थान नाही, रात्र उरली एकली.

**-उमा बोडस**

# होरपळ

जन्म अन मृत्यू
अभेद्य चौकट
कर्ता करविता
अज्ञात अनवट

हाडांच्या समिधा
देहाची गोवरी
रक्ताचे अर्ध्य
श्वास पळी भरी

आशा निखाऱ्यातळी
राखेची भुतं
इच्छांच्या ज्वाळात
वर्तमानाची खंत

धुरकट भविष्यात
दिसे पेटते पळ
दिसत नाही.. जिवंत
भावनांची होरपळ

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

बघता बघता होते
पुर्ण आयुष्य स्वाहा
कुणी म्हणे 'अरेरे'
कुणी म्हणे 'वाहवा'

- **कौतुक शिरोडकर**

साहित्य संस्कृती
संस्कृती, कला, जाणिवा जोडणारा सेतू

## शोध

शोध तुझा घेते बाई
रास मांडते
नवलाई मागा पायी
आस ठेवते

शोधायला तुला बाई
रान मोडीते
वाऱ्याच्या ग रुपामधे
तुला वेचिते

पायातला काटा बाई
वाट दावीतो
वाटेतल्या खाचांमध्ये
तुला भरतो

दिवस विझला बाई
तूच दिसेना
श्वासाच्या या जगण्याला
श्वास पुरेना

नवलाई दान बाई
सांजे गावलं
तुळशीच्या दिव्यामध्ये
तुला पाहिलं

शोध तुझा सरे बाई
ध्यास सुखाचा
डोळ्याच्या ग आसामधे
नभ भरण्याचा

**अभिरुची**

-

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

# बहिष्कार

**"बहिष्कार"** हा गुजराती भाषेतील महत्त्वाच्या कवयित्री **पन्ना नायक** यांच्या निवडक कवितांचा मराठी अनुवाद! पॉप्युलर प्रकाशनाने प्रकाशित केलेला आणि **दिलीप चित्रे** यांनी अनुवादित केलेला हा संग्रह आवर्जून नोंद घ्यावा असा आहे.

चंद्रमोहन कुलकर्णी यांनी केलेल्या बोलक्या मुखपृष्ठापासून या संग्रहातला प्रत्येक शब्द वाचकाच्या मनात रेंगाळतो. गेली चार तपाहून अधिक काळ पन्नाबेन कविता लिहीत आहेत. वयाच्या ऐंशीव्या वर्षीही त्या सजगपणे, प्रगल्भपणे आणि निर्भयपणे शब्दातून जाणिव व्यक्त करतात. त्यांच्या सहा संग्रहातल्या वडक कवितांचा अनुवाद बहिष्कार या संग्रहात आहेत.त्या कविता वाचतांना रोजच्या जीवनातले प्रसंग वेगळे

परिमाण घेऊन समोर उभे राहतात.
*...आणि मी मात्र*
*प्रत्येक वेळी संभोगानंतर*
*तुला लगेचच झोप लागते*
*.. आणि मी मात्र*
*माझ्या कधीही*
*जन्माला न येऊ शकणा-या*
*बाळाच्या विचाराने*
*कूस बदलत*
*दु:स्वप्नातच अडकून पडते.*


बहिष्कार
पन्ना
नायक
अनुवाद । दिलीप वि. चित्रे

त्यांच्या कवितांमध्ये भारतीय तसेच अनिवासी भारतीय कवींच्या कवितेत आढळणारे परदेशातील संदर्भ सहजपणे येतात.

**लिफ्ट**

“आपलं आयुष्य
तळमजल्यावरून पाचव्या मजल्यावर
जाणा-या लिफ्टमधील
दोन अपरिचित व्यक्तींची टक्कर व्हावी
तसं.”

निसर्गवर्णन, प्रतिमा, परदेशातले वातावरण असे विविध शब्द आणि संदर्भ कवितांमध्ये आहेत.

*“चला, उठू या*
*सन-टॅन्ड झालेली दुपार*
*आता सकाळसारखी कोवळी राहिलेली नाही.”*

ती कविता नुसती स्मरणरंजन नाही. ती कविता जळजळीत आहे, आश्चर्यचकित करणारी आहे. तसेच विचार करायला लावणारी आहे. वेगळया प्रतिमा कवितेत प्रकर्षाने दिसतात.

त्या कवितेत आठवणींचे फक्त कढ नाहीत. तर त्या आठवांकडे, भूतकाळाकडे अलिप्तपणे, हळवे होऊन तसेच काही वेळा अतिशय कठोरपणे बघण्याची वृत्ती सुद्धा आहे.

*माझ्या घरासमोर*
*माझ्या घरासमोर*
*माझा भूतकाळ*
*सिमेंटचा रस्ता होऊनच उभा ठाकलाय.*

आजारपण, विरह, प्रेम, विभक्ती, मातृत्वहीनता, मृत्यू अशा भावना ही कविता समर्थपणे व्यक्त करते. पानगळ या कवितेत त्या म्हणतात,

*माझ्या देहाची पानंसुद्धा*
*आता हिरव्याकडून पिवळ्याकडे,*
*थोडीशी लाल- तपकिरी होण्याकडे*
*झुकू लागली आहेत.*

*कधी कधी*
*जीवनाची पावलं धुळीनं माखू नयेत*
*म्हणून*
*कधी कधी मी मृत्यूला*
*माझं अंगण झाडतांना पाहते.*

त्यांची कविता समाजातील स्त्री शोषण, दांभिकता, हिंदू संस्कृतीच्या पदराखाली दडून चालवलेली स्त्रीची उपेक्षा इत्यादी अनेक गोष्टींवर प्रहार करते.

**स्त्रीस्वातंत्र्य**
*दोन पायांपैकी*
कुठला पाय

उकळत्या पाण्यात बुडवायचा
आणि कुठला
*बर्फाच्या ढिगा-यात*
*याचा*
*स्वतंत्र निर्णय घेण्याचा*
*दिलेला अधिकार*
*म्हणजेच स्त्रीस्वातंत्र्य.*

या संग्रहातल्या विविध कवितांमधून पुरुषांच्या खोटारेडेपणाचे, अधिकारवाणीचे पुरावे ही कविता देते. हिंदू संस्कृती आणि मुलगा वा मुलगी दोघांना वाढवतांनाचा भेदभाव स्पष्टपणे ही कविता व्यक्त करते.

*माझं शरीर*
*रोज रात्री*
*लग्नाचा कर वसूल करणारे*
*त्याचे ओठ*
*माझ्या ओठांमधील अमृत शोषून घेत आहेत.*

गुजराती साहित्यात काय इतर भारतीय भाषांतही त्या काळात स्त्रियांनी थेटपणे अशाप्रकारची अभिव्यक्ती स्वीकारली नव्हती त्या काळात पन्नाबेन लिहीत होत्या.

याच कवितेत त्या पुढे लिहितात
*नजरेनंच माझ्या शरीरावरची*
*सगळी वस्त्रं ओरबाडली जात आहेत*
*त्याचवेळी*

*देशोधडीला लागलेली*
*तुझी आठवण*
*माझ्या शयनगृहाचा बंद दरवाजा ठोठावते आहे.*

छंदोबद्ध रचनेऐवजी त्यांची कविता मुक्तछंदात आहे. ती लय नाद आणि रस-रूप-गंध-स्पर्श अशा विविध संवेदनातून फुलते. आपल्या बदललेल्या आयुष्याचे, जीवनमानाचे परिणाम अधोरेखित करते.

अनिवासी भारतीयांच्या दांभिकतेचे, श्रीमंतीचे, अनिश्चितता, असुरक्षितता आणि भयाने पछाडलेल्या स्वभावाचे नेमके वर्णन काही कवितांमध्ये येते.या कविता जणु डोळयात घातलेले अंजन आहे.

***मित्राच्या सत्तराव्या वाढदिवशी*** या कवितेत त्या म्हणतात,”

*त्याच कंटाळवाण्या गप्पा होत्या.*
*तेच फालतू विनोद होते.*
*तीच कृत्रिम हसणी होती...*

*तेच "वी हॅव मेड इट" चे अहंकार होते.*

..

*एका हातात दारूचा ग्लास आणि*
*दुस-या हाताने शेंगदाणे फाकता फाकता*

*इंडियासाठी आपण काही करायला हवं*
*अशी अपराधीपणाची भावनाही होती.*

पन्नाबेन यांच्या काही कवितांवर विशिष्ट कालखंडाची मोहोर, ठराविक काळाचे संदर्भ आहेत. तसे असले तरी त्यात व्यक्त झालेली भावना मात्र कोणत्याही काळात वाचकाला स्वत:शी जोडता येईल  अशी आहे.

**नातं**

*कोणा उपाशी होमलेस अमेरिकन माणसाने*
*शुक्रवारी घराबाहेर ठेवलेला*
*ट्रॅशकॅन उपसावा त्याप्रमाणे*
*शनि-रविवारी*
*एक भारतीय*
*दुस-या भारतीयाच्या घरी*
*काश्मिरी गालिच्यावर ठेवलेल्या*
*पारदर्शक काचेच्या*
*टेबलावर*
*आकर्षक बोल्समध्ये*
*काठोकाठ भरलेले*
*बदाम..काजू..पिस्ते*
*यात*
*शोधत असतो*
एकदुस-याशी जडलेलं
नातंच!

या कवितेत आत्मशोध आहे. या कवितेत तडफ आहे. पण अनुभव हा केवळ व्यक्तिगत न राहता तो सार्वत्रिक होतो हे या कवितांचे खरे यश आहे.

हा संग्रह वाचला तर पारंपरिक गुजराती समाजाच्या सर्व संकल्पनाच पन्नाबेनच्या कवितेने मुळापासून ढवळून काढल्या, उखडून टाकल्या असे वाटते.

**दिलीप चित्रे यांनी केलेला अनुवाद वाचतांना या कविता इतर भाषेतून मराठीत आल्या आहेत हे जाणवत नाही. त्या अनुवादित आहेत असे वाटत नाही इतके हे लेखन ओघवते आणि सहज आहे, कुठेही भाषिक कसरत करावी लागली आहे असे जाणवत नाही.**

मराठी कवितांमध्ये धीट कविता, स्त्रीवादी कविता यांची अनेक उदाहरणे आहेत. प्रामाणिक अशी आणि भीती न बाळगणारी ही कविता मराठी वाचकांना अवश्य वाचावी अशीच आहे.

**-सोनाली जोशी**

*प्रकाशक- साहित्यसंस्कृती प्रकाशन*
*www.sahityasanskruti.com*
*संपादन- सोनाली जोशी*
*मुखपृष्ठ -मयूर कुलकर्णी(atizmayur@gmail.com)*

***All rights reserved. No part of these poems can be published without the written consent of the poet/poetess.***

To submit your poems/ writing/join the team-

please send an email to-

eksakhee@gmail.com

anahatmagazine@gmail.com

Help us spread the love of poetry. Please like us on Facebook at

***www.facebook.com/sahityasanskruti***

*Thank You!*